# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
E-mail : diplomadesk10dte@gmail.com website: www.dte.org.in


<u>महत्वाचे परिपत्रक</u>

क्रमांक : १०/एनजीपी/एनबीए/२०१५/ ११२८
दिनांक : 16 SEP 2015

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती/औरंगाबाद/मुंबई/नागपूर/नाशिक/पुणे

**विषय:- शासकीय/शासन अनुदानित तंत्रनिकेतने/औषधनिर्माणशास्त्र संस्था/एच.एम.सी.टी. संस्थामधील अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या अखत्यारीतील सुरु असलेल्या पदविका अभ्यासक्रमाचे एनबीए (NBA) कडून Accreditation करुन घेण्याबाबत...**

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या अखत्यारीतील व संचालनालयाचे अंतर्गत कार्यरत / संलग्न असलेल्या पदविका अभ्यासक्रमाच्या सर्व शासकीय व शासन अनुदानित संस्थांना सूचित करण्यात यावे की, सर्व संस्थांना त्यांचे संस्थेमध्ये सुरु असलेल्या पात्र पदविका अभ्यासक्रमाचे National Board of Accreditation, New Delhi यांचे कडून Accreditation प्राप्त करुन घेण्याबाबतची कार्यवाही तात्काळ करण्यात यावी. तसेच या बाबत सर्व पदविका संस्थांकडे पाठपुरावा करावा. उपरोक्त संस्थांनी त्यांचे संस्थेतील अभ्यासक्रमासाठी मानांकनाचे प्रस्ताव NBA कडे डिसेंबर २०१५ पुर्वी सादर करावेत. ज्या संस्थांनी आवश्यक शुल्क भरुन प्रस्ताव सादर केले आहेत, परंतु अद्याप N B A कडुन तपासणी झालेली नाही त्या संस्थेच्या प्राचार्यांनी व्यक्तीशः पाठ पुरावा करावा.

एन.बी.ए. कडे अभ्यासक्रमनिहाय मानांकनाचा प्रस्ताव सादर करण्यापुर्वी संबंधीत संस्थाप्रमुखांनी पात्र अभ्यासक्रमांचे अंतर्गत मुल्यांकन दि. ३१ ऑक्टोंबर २०१५ पुर्वी पूर्ण करुन घेण्यात यावे व त्याचा विभाग निहाय एकत्रित अहवाल संचालनालयास सादर करावा. या मुल्यांकनामध्ये ज्या अभ्यासक्रमांस कमीत कमी तीन वर्षासाठी मानांकन मिळू शकेल याची खात्री झाल्यानंतरच अशा अभ्यासक्रमांचे एन.बी.ए. कडे आवश्यक शुल्क भरुन मुल्यांकनाचे प्रस्ताव सादर करावेत. (अन्यथा सदर अभ्यासक्रमांसाठीचे मुल्यांकनाचे प्रक्रीया शुल्क वाया जाण्याची शक्यता आहे). शासकीय व शासन अनुदानित संस्थांना त्यांचे संस्थेतील पात्र अभ्यासक्रमांचे (शासन अनुदानित संस्थामधील अनुदानित अभ्यासक्रम) एन.बी.ए. मानांकनासाठीचे प्रक्रिया शुल्क संस्थेचे विकास निधीमधून खर्च करण्यासाठी सदरहु परिपत्रकान्वये या संचालनालयाची परवानगी देण्यात येत आहे. मानांकनाचे प्रस्तावासंबंधी /प्रत्यक्ष मिळालेले मानांकन संस्थानिहाय सद्यस्थितीचा अहवाल सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये यांनी सोबतच्या प्रपत्रात दिनांक ०५/१०/२०१५ पर्यंत या संचालनालयास सादर करावा.

विनाअनुदानित खाजगी संस्थांना सुध्दा उपरोक्त प्रकारच्या सुचना आपले स्तरावरुन निर्गमित करुन या संबंधीचा आढावा घेऊन अहवाल संचालनालयास सादर करावा.

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई-१

सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर.
क्र :-तंशिसं/विकाना/पदविका/एनबीए/२०१५/ 2950
दि. 19 SEP 2015

प्रति,
प्राचार्य,
सर्व अभियांत्रिकी/ औषधनिर्माणशास्त्र /हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरिंग टेक्नॉलॉजी पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था.
नागपूर विभाग.

त्यांना कळविण्यात येते की, संचालनालयाचे सदर पत्रातील सूचनांची नोंद घेऊन त्याप्रमाणे कार्यवाही करुन त्यांबाबत या कार्यालयास कळवावे.

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर

प्रत:- प्रोग्रामर, यांनी सदरचे पत्र या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

## Institute Status regarding NBA Accreditation

Region:

| Sr. No. | Name of Institute | Govt./Govt. Aided | Year of Establishment | Courses | Intake | Whether courses are accreditated or not. If Yes, period of validity /re- accreditation | Applied for Accreditation or not | Reason for not applying |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |

Signature :

Note: The issue of staff shortage is being dealt on warfooting by sending requisition for all vacant teaching posts and by continious interviews at MPSC level. In Addition to that, arrrangement can be made by the way of CHB/Guest Lecturers. So this issue should not be hurdle in applying for NBA accreditation.